# गोखले

## माझे राजकीय गुरू

लेखक : महात्मा गांधी

भाषांतरकार : वि. अ. पटवर्धन



# ले

## राजकीय गुरू

लेखक : महात्मा गांधी

भाषांतरकार : वि. अ. पटवर्धन

Y2wM66
K9
29376



# गोखले

## माझे राजकीय गुरु

लेखक

**महात्मा गांधी**

भाषांतरकार

**वि. अ. पटवर्धन**

चेतक
पुस्तकें
चिराबाजार
मुंबई २

किंमत
अडीच
रुपये

© नवजीवन ट्रस्ट

मराठी पहिली आवृत्ति
४ सेप्टेंबर, १९६९
कालाष्टमी, १८९१

मुद्रक : श. कृ. सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस
त्रिभुवन रोड, मुंबई ४

प्रकाशक : बा. ग. ढवळे
चेतक पुस्तकें
चिराबाजार, मुंबई २

एकमेव वितरक
साहित्य सहकार संघ, लि.
नायगांव क्रॉस रोड, मुंबई १४

# महात्मा गोखले

महात्मा गांधी नामदार गोपाळ कृष्ण गोखले ह्यांना आपले राजकीय गुरु मानीत. राजकीय अगर कोणतेंही सार्वजनिक कार्य करतांना साधनशुचितेवर दोघांचाही आग्रही कटाक्ष असे. सार्वजनिक जीवन हें अध्यात्मनिष्ठ झालें पाहिजे असें गोखले म्हणत, तर महात्माजींनीं आपल्या सर्व चळवळींचा मूलभूत पाया 'सत्य' मानला होता.

महात्माजींनीं आपल्या राजकीय गुरूंबद्दल वेळोवेळीं जे उद्गार काढले होते, किंवा जें लेखन केलें होतें, त्यांचें संकलन करून, अहमदाबादच्या नवजीवन ट्रस्टनें 'गोखले : माझे राजकीय गुरु' हें पुस्तक १९५५ मध्यें प्रसिद्ध केलें. महात्माजींच्या भाषणांतून अगर लेखांतून केवळ आदरांजलि किंवा श्रद्धांजलि वाहिलेली नाहीं, तर गोखले ह्यांच्या राजकीय चळवळीची बैठक कशी होती, ह्याचें मोठें मार्मिक विश्लेषण आहे. त्यांनीं आपल्या भाषणांतून गोखल्यांचा उल्लेख 'महात्मा गोखले' असा मोठ्या आदरानें केलेला आढळतो.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले ह्यांची अर्वाचीन भारताच्या शिल्पकारांत यथार्थतेनें गणना केली जाते. त्यांचा जन्मशताब्दिदिन दिनांक ९ मे, १९६६ रोजीं देशभर साजरा झाला. माजी राष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् ह्यांच्या अध्यक्षतेखालीं, जो समारंभ पुण्यास गोखल्यांनीं स्थापन

केलेल्या भारत-सेवक-समाजाच्या पवित्र वास्तूंत साजरा झाला, त्यांत त्यांनीं, गोखले ह्यांचा आदर्श, सर्व सार्वजनिक कार्यकर्त्यांनीं आपल्यापुढें ठेवण्याबद्दल आवाहन केलें.

अशा गोखल्यांबद्दल महात्मा गांधींनीं प्रगट केलेले विचार मराठी वाचकांना वाचायला मिळावेत, हा हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांतला प्रमुख हेतु. मराठी वाचक, विशेषतः विद्यार्थीवर्ग, हें पुस्तक मननपूर्वक वाचून, त्यांतील विचारसरणीचें आचरण बऱ्याचशा प्रमाणांत करील, अशी आशा बाळगावी काय ?

अहमदाबादच्या नवजीवन ट्रस्टनें सदर पुस्तक प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

प्रकाशक

# महात्माजी
# काय
# म्हणतात....


१. प्रास्ताविक १

गोखले ह्यांची चरित्ररेखा

दक्षिण आफ्रिकेला

गोखले ह्यांचा परिचय

२. गोखले ह्यांच्या सहवासांत

१ : गोखले ह्यांजबरोबर माझी पहिली मुलाखत ९

२ : गोखल्यांच्या सहवासांत कलकत्त्यांतला एक महिना ११

३ : गोखले ह्यांचें दक्षिण आफ्रिकेंत आगमन १६

४ : टॉलस्टॉय फार्मला गोखले ह्यांची भेट २६

५ : गोखले ह्यांजकडून मिळालेलें प्रशस्तिपत्र २९

६ : गोखले ह्यांचा दक्षिण आफ्रिकेंतला पुढचा दौरा ३०

७ : अखेरपर्यंत सत्याग्रह ३६

प्रतिज्ञा पाळली. अशा बाण्याचीं माणसें जेव्हां आपलें आयुष्य शिक्षणकार्याला समर्पण करतात, तेव्हांच शिक्षण फलदायी होतें आणि विद्यार्थ्यांच्या शीलाची घडण चांगली होते. गोखले ह्यांनीं फर्गसन कॉलेजांत वीस वर्षं व्यतीत केलीं आणि ते जरी जाहीर सभांतून फारसे दिसत नव्हते, अगर वृत्तपत्रांमध्यें त्यांच्याविषयीं फारसें वाचायला मिळत नव्हतें, तरी देखील अनेक तरुणांना त्या काळांत त्यांच्यापासून स्फूर्ति मिळाली.

ते कॉलिजला मिळाले त्याच सुमारास कै० महादेव गोविंद रानडे ह्यांच्याशीं त्यांचा निकट संबंध आला आणि त्यांच्या व्यक्तित्वाला आकार देण्याची कामगिरी मुख्यत्वेंकरून रानडे ह्यांनींच केली. न्यायमूर्ति रानडे ह्यांच्या प्रभावी मार्गदर्शनानुसार त्यांनीं बारा वर्षांहून अधिक काळ अर्थशास्त्राचा अभ्यास केला. ह्याचा परिणाम असा झाला, कीं आर्थिक प्रश्नांवरील गोखले ह्यांचीं मतें आज देखील हिंदुस्थानांत प्रमाण मानलीं जातात. गोखले ह्यांची रानडे ह्यांजवर फार भक्ति होती आणि ते त्यांना आपले गुरु मानत असत. पुणें येथील सार्वजनिक सभेच्या वतीनें प्रकाशित होत असलेल्या त्रैमासिकाचें संपादकत्व त्यांनीं रानडे ह्यांच्या आदेशावरून स्वीकारलें. त्यानंतर लवकरच डेक्कन सभेच्या सन्माननीय चिटणीसपदावर त्यांची नेमणूक झाली. इंग्रजी व मराठी ह्या दोन्ही भाषांतून निघणारें पुण्याचें साप्ताहिक 'सुधारक' ह्याचेही ते संपादक होते. मुंबई प्रांतिक परिषदेचे ते चार वर्षं सेक्रेटरी होते. १८९५ सालीं पुण्यांत भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनाचे सेक्रेटरी म्हणूनही त्यांची नेमणूक झालेली होती. सेवा करण्याविषयींची त्यांची उत्सुकता व सार्वजनिक कार्याविषयींची त्यांची जाणीव ह्या गोष्टींना ह्या काळांत एवढी चांगली मान्यता मिळाली, कीं 'दख्खनचा उगवता तारा' म्हणून त्यांची ख्याति होऊं लागली.

त्यांची अभ्यासू वृत्ति व कार्यनिष्ठा ध्यानांत घेऊन, मुंबई जनतेनें वेल्बी कमिशनसमोर साक्ष देण्यासाठीं श्री. वाच्छा ह्यांच्या जोडीला त्यांची निवड केली. हिंदुस्थानांतील सार्वजनिक खर्चाच्या प्रश्नाची चौकशी करण्यासाठीं हें कमिशन नेमलेलें होतें. त्यांनीं कमिशनपुढें सादर केलेला पुरावा मौल्यवान ठरला, ही गोष्ट कागदोपत्रीं नमूद आहे.

इंग्लंडमधील वास्तव्यांत त्यांनीं हिंदुस्थानांतील परिस्थितीसंबंधीं कांहीं व्याख्यानें दिलीं. प्लेगच्या काळांत मुंबई सरकार इलाख्याचा कारभार कसा चालवीत होतें, ह्या कामासाठीं नेमलेल्या गोऱ्या सोजिरांनीं धाकदपटशाचीं कृत्यें कशीं केलीं, ह्याबाबत त्यांनीं कडक टीका प्रसिद्ध केली. १९०२ सालीं ते फर्गसन कॉलेजच्या सेवेंतून २५ रु. पेन्शन घेऊन निवृत्त झाले. ह्याच सुमारास मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर मुंबई इलाख्याचे प्रतिनिधि म्हणून ते निवडून आले. सर फेरोजशहा मेहता हे प्रकृतीच्या कारणासाठीं कौन्सिलांतून निवृत्त झाले होते आणि त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर ही निवड झाली. प्रतिनिधि ह्या नात्यानें गोखले ह्यांनीं आपलें कर्तव्य इतकें चोख बजावलें, कीं ह्या जागेवर आजतागायत ते पुन्हा पुन्हा निवडून येत आहेत.

मध्यवर्ती कायदे कौन्सिलांत निवडून आल्यापासून गोखले ह्यांच्या सार्वजनिक जीवनांत एक नवें पर्व सुरू झालें. देशप्रीत्यर्थ त्यांनीं केलेल्या सेवेमध्यें ही कामगिरी मोठी मोलाची असल्याचें सिद्ध झालें. त्यांनीं कौन्सिलांत अंदाजपत्रकावर केलेल्या पहिल्याच भाषणाला टाळ्यांचा गौरवपूर्ण प्रतिसाद मिळाला. तेव्हांपासून प्रत्येक संबंधित व्यक्ति त्यांचीं अंदाजपत्रकावरील भाषणें ऐकायला उत्सुक असते. अंदाजपत्रकांत दर्शविलेली शिल्लक कशी दिशाभूल करणारी असते आणि जनतेची भरभराट होत असल्याचें तिच्यावरून

कसें सिद्ध होत नाहीं, ही गोष्ट त्यांनीं वर्षानुवर्षें दाखवून दिलेली आहे. हिंदी लोकांना सरकारी खात्यांमध्यें अधिक मोठ्या प्रमाणांत नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत, असा त्यांनीं दर वर्षीं आग्रह धरला आहे. लष्करी खर्चांत कपात करण्याचा पाठपुरावा त्यांनीं दर वर्षीं केला आहे. मिठावरचा कर रद्द झाला पाहिजे, पाटबंधाऱ्यांची वाढ केली पाहिजे आणि तांत्रिक शिक्षणाच्या सोयी अधिक व्यापक प्रमाणांत केल्या पाहिजेत, अशा मागण्या त्यांनीं दर वर्षीं केल्या आहेत. दर वर्षीं त्यांनीं मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठीं व अशाच इतर सुधारणांसाठीं हाकाटी चालविलेली आहे. मिठावरचा कर जो कमी झाला, तो मुख्यत्वें त्यांच्याच परिणामकारक पुरस्कारामुळें.

हिंदुस्थानांतील अत्यंत उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपैकीं कांहींजण त्यांच्याशीं आपली मैत्री असल्याचें अभिमानपूर्वक सांगतात; आणि मग्रूर लॉर्ड कर्झन देखील त्यांना तुल्यबल योद्धा मानत असे. तो म्हणे, "गोखले ह्यांजबरोबर चर्चेमध्यें युक्तिवादांची देवघेव करतांना फार प्रसन्नता वाटते." आपल्या आढळांत आलेल्या अत्यंत सामर्थ्यशाली पुरुषांपैकीं गोखले हे एक आहेत, असे उद्गारही त्यानें काढल्याचें सांगतात. गोखले हे कौन्सिलांत लॉर्ड कर्झनचे दुर्दम्य विरोधक असले, तरी देखील त्यांचें मोठें कर्तृत्व आणि उदात्त चारित्र्य लक्षांत घेऊन कर्झननेंच त्यांना सी. आय. ई. हा मानाचा किताब दिला आणि हा किताब मिळाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणारें एक खाजगी पत्र त्यांना लिहिलें.

गोखले अगदीं सुरुवातीपासून काँग्रेसच्या चळवळींत सामील झाले. काँग्रेसच्या बहुतेक सगळ्या अधिवेशनांना ते हजर राहिले आणि त्यांमध्यें त्यांनीं भाषणें केलीं. त्यांचें अत्यंत गाजलेलें भाषण म्हणजे १९०४ सालच्या मुंबई काँग्रेस अधिवेशनांतलें. हिंदी

खर्जिन्यांतील शिल्लक हा त्याचा विषय होता. सर हेन्री कॉटन ह्यांच्या मतें ब्रिटिश पार्लमेंटच्या कॉमन्स सभेंत ऐकायला मिळालेल्या सर्वोत्तम भाषणांशीं तुलना करण्याच्या योग्यतेचें तें भाषण होतें.

हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितीची माहिती ब्रिटिश जनतेला देण्यासाठीं जें शिष्टमंडळ इंग्लंडला रवाना झालें, त्याचे एक सभासद म्हणून मुंबई इलाख्याच्या जनतेनें त्यांना निवडून दिलें. ह्या नात्यानें त्यांनीं आपलीं कर्तव्यें फारच समाधानकारक रीतीनें बजाविलीं. पन्नास दिवसांत त्यांनीं किमानपक्षीं पंचेचाळीस भाषणें केलीं. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यकारभारावरील हिंदी लोकमत सादर करण्याची त्यांची हातोटी व कुशलता पाहून अनेक कर्तबगार व प्रख्यात इंग्रजांना आश्चर्य वाटलें. इंग्लंडमधील वास्तव्यांतच त्यांची निवड पवित्र काशीक्षेत्रीं होणाऱ्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून झाली. बनारस कॉंग्रेसमधील त्यांचें अध्यक्षीय भाषण सुस्पष्टता व कुशल मांडणी ह्या गुणांनीं सरस ठरलें. बनारस कॉंग्रेसनंतर लवकरच ते इंग्लंडला परत गेले आणि लॉर्ड मोर्ले ह्यांजबरोबर त्यांची अनेकदा सल्ला-मसलत झाली. लॉर्ड मिंटो ह्यांनीं तयार केलेल्या सुधारणांच्या नव्या योजनेसंबंधांत ते १९०८ सालीं पुन्हा इंग्लंडला गेले.

हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांतून राजकीय कार्याला आपलें आयुष्य वाहाणारे निदानपक्षीं कांहीं थोडे तरुण तरी पुढें आले पाहिजेत, ही तातडीची गरज आहे, ह्या गोष्टीवर गोखले पुन्हा पुन्हा जोर देत असत. वस्तुतः देशसेवेच्या एकमेव उद्देशानें प्रेरित झालेल्या राजकीय संन्याशांचा एक पंथच निर्माण करावा, अशी त्यांची फार पूर्वीपासून आकांक्षा होती. त्यांनीं स्थापन केलेल्या ‘ सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी ’ च्या ( ‘ भारत-सेवक-समाजा ’ च्या ) रूपानें अलीकडेच ह्या आकांक्षेला मूर्त स्वरूप आलेलें आहे. सोसायटीचे

उद्देश खरोखरीच उदात्त आहेत आणि भविष्य काळीं ह्या देशाची अधिकाधिक सेवा करण्याचें सामर्थ्य व कर्तृत्व तिच्या अंगीं बाणेल, अशी आपण सर्वजण इच्छा धरूं या.

गोखले श्रोत्यांसमोर भाषणें कशा रीतीनें करतात, ह्याविषयीं एक-दोन शब्द सांगतों. रूढ अर्थानें वक्ता ह्या सदरांत ते मोडत नाहींत. श्रोत्यांच्या भावना जागृत करण्याचा त्यांचा प्रयत्न नसतो. आपल्याला जें कांहीं सांगायचें असेल, त्याबद्दल श्रोत्यांची खात्री पटवून देणें, हाच त्यांचा एकमेव उद्देश असतो. ते बोलतात जलद. त्यांचा दारूगोळा म्हणजे वास्तव घटना व आंकडे ह्यांची रेलचेल. त्यांचे युक्तिवाद समजूत पटविणारे व उत्साहपूर्ण असतात आणि त्यांची शैली साधी, पण विशुद्ध आणि खंबीर असते.

गोखले हे उत्साही सुधारक आहेत. ते पुण्याहून प्रसिद्ध होणारें 'ज्ञानप्रकाश' नामक दैनिक चालवितात आणि त्या साधनाद्वारा ते राजकीय व सामाजिक सुधारणेविषयींच्या आपल्या विचारांचा प्रचार करतात. त्यांची राहाणी फार साधी आहे. खरोखरी तिला 'रुक्ष'च म्हणावें. वस्तुतः सुप्रसिद्ध पत्रकार मिस्टर नेव्हिन्सन ह्यांच्या शब्दांत आपण असें म्हणूं, कीं त्यांनीं आपलें सगळें आयुष्य दारिद्र्याला व ज्ञानसाधनेला वाहिलेलें आहे. साधी राहाणी, उच्च विचारसरणी आणि उदात्त कृति ह्या प्राचीन हिंदु आदर्शाचें अधिक चांगलें उदाहरण आज सापडणारच नाहीं म्हटलें तरी चालेल.

शिक्षणविषयक बिल आणि हिंदी मजुरांची मुदतबंदीची गुलामगिरी रद्द करण्याचा प्रयत्न, ह्या दोहोंची गणना गोखले ह्यांनीं सार्वजनिक सेवेच्या क्षेत्रांत शेवटीं शेवटीं केलेल्या महान कार्यांमध्यें होते. व्हाइसरॉयच्या कौन्सिलांत इतर लोकोपयोगी बिलांची जी गत होते, तीच गत शिक्षणविषयक बिलाच्या वांट्याला आली. परंतु ह्या कामीं

त्यांना हिंदुस्थानच्या सर्व भागांतून व सर्व जातीजमातींकडून एवढा एकमुखी पाठिंबा मिळाला, कीं त्यांच्या ह्या एकजुटीच्या सामर्थ्यापुढें सरकारचा विरोध फार काळ टिकाव धरणें शक्य नाहीं.

ह्या देशांतून मुदतबंदीच्या मजुरीच्या प्रथेची हकालपट्टी झाली, ह्याबद्दल आपण गोखले ह्यांचे फार ऋणी आहोंत. ह्या विषयावर इंडियन लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत त्यांनीं जें भाषण केलें, त्यावरून हें स्पष्ट दिसून येतें, कीं आपले विविध व्याप संभाळून व आपल्या नाजूक प्रकृतीची पर्वा न करतां, त्यांनीं ह्या विषयाचा केवढा तरी सखोल अभ्यास केलेला आहे.

मुदतबंदीच्या मजुरीच्या प्रश्नाचा लक्षपूर्वक अभ्यास करण्यांत वेळ खर्च करून, शिवाय ते आमच्या (म्हणजे दक्षिण आफ्रिकेंतल्या) विविध अडचणींवर बारकाईनें लक्ष ठेवीत असतात आणि आमच्या सत्याग्रह मोहिमेला त्यांनीं मोलाची मदत केलेली आहे. आमच्या-विषयींची त्यांची सहानुभूति आतां अशा थराला येऊन पोंचली आहे, कीं ह्या देशाला (म्हणजे दक्षिण आफ्रिकेला) जातीनें भेट द्यावी आणि येथल्या आमच्या परिस्थितीचें प्रत्यक्ष ज्ञान मिळवावें, असा त्यांनीं निर्धार केलेला आहे.

मातृभूमीच्या सेवेप्रीत्यर्थ आपलें सगळें आयुष्य समर्पण करणाऱ्या गोखल्यांच्या अंगीं जें शहाणपण व बुद्धितेज आहे, तेवढें आपणांपैकीं सगळ्यांना आत्मसात् करणें कदाचित् शक्य होणार नाहीं. परंतु ते जसे त्यांनीं पतकरलेल्या कार्याशीं पूर्णपणें एकरूप झाले, तसें आपणा सर्वांनाही आपण पतकरलेल्या कार्याशीं संपूर्णपणें एकरूप होणें शक्य आहे. गोखल्यांनीं जें कार्य अंगीकारलें, त्याला त्यांनीं सर्वस्वीं वाहून घेतलें आणि ह्याच कारणास्तव सारा देश व देशाचे दोस्त त्यांना एवढा मान देतात. ही लहानशी चरित्ररेखा वाचल्यानंतर आपण

सारे अशी इच्छा प्रदर्शित करूं या, कीं त्यांना दीर्घायुष्य लाभो आणि त्यांनीं आमच्या अंतःकरणांत जो ठसा उमटविलेला आहे, तो कधींही पुसट न होवो.

**'इंडियन ओपियन', १९१२**